**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/2939/2024-25 **दिनांक** :-21/10/2024

**प्रति,**
1. **ज्ञानदिप अॅकडमी, पुणे**
2. **युनिक अॅकडमी, पुणे**

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2024-25 करिता प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात रूजू करून घेण्याबाबत संबंधित प्रशिक्षण संस्थांना सूचना**

**संदर्भ** :- प्रशिक्षण संस्थेत रूजू झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेमार्फत प्राप्त अहवाल.

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2024-25 करिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संस्थानिहाय यादी दि.11/10/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दि.15/10/2024 रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्रात रूजू होण्याकरिता कळविण्यात आले होते. दि.11/10/2024 रोजी सदर प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी देखील प्रसिध्द करण्यात आली होती व निवड यादीतील जे विद्यार्थी रूजू होणार नाही त्या ऐवजी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येईल असे कळविण्यात आले होते. त्यानुसार सर्व संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सद्यस्थितीत प्रशिक्षण संस्थेत रिक्त असलेल्या जागांकरिता संवर्गनिहाय संख्येचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **जात प्रवर्ग** | **प्रवर्ग** | **रिक्त असलेल्या जागा** |
|---|---|---|
| VJ | खुला प्रवर्ग 70% | 18 |
| | महिला प्रवर्ग 30% | 9 |
| NT-B | खुला प्रवर्ग 70% | 14 |
| | महिला प्रवर्ग 30% | 8 |
| NT-C | खुला प्रवर्ग 70% | 21 |
| | महिला प्रवर्ग 30% | 11 |
| NT-D | खुला प्रवर्ग 70% | 8 |
| | महिला प्रवर्ग 30% | 4 |
| OBC | खुला प्रवर्ग 70% | 111 |
| | महिला प्रवर्ग 30% | 51 |
| SBC | खुला प्रवर्ग 70% | 14 |
| | महिला प्रवर्ग 30% | 5 |
| | **एकूण-** | **270** |

रिक्त असलेल्या जागी यापूर्वीच प्रसिध्द केलेल्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतची कार्यवाही आपल्या संस्थेद्वारा करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात सादर करण्यात यावा. प्रवेश द्यावयाच्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांची यादी यासह संलग्न करण्यात येत आहे.

संबंधित विद्यार्थ्यांना रूजू होण्याकरिता दि.25/10/2024 पर्यंत मुदत देण्यात यावी या मुदतीत संबंधित विद्यार्थी रूजू न झाल्यास या कार्यालयास न चुकता कळवावे.

**सहपत्र** :- **विद्यार्थ्यांची यादी**

स्वा

(विकास गडपायले)
**प्रकल्प व्यवस्थापक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर